FIR प्रत मिळाली

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** शिवाजी नगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0990 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 23/12/2024 13:11

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरम्यानचे दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 25/09/2024

**Date To ( दिनांक पर्यंत):** 26/09/2024

**Time From (वेळेपासून):** 17:19 वाजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:52 वाजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 23/12/2024 **Time (वेळ):** 12:30 वाजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 018

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/12/2024 12:38 वाजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** नगर भुमापन अधिकारी कार्यालय,इचलकरंजी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) Name (नाव): विश्वनाथ कष्णा घाटगे

(b) Father's Name (वडील चे नाव) : कष्णा घाटगे

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष): 1979

(d) Nationality (राष्ट्रीयत्व): भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):

(f) Passport No.(पारपत्र क्र.):

Date of Issue (दिल्याची तारीख):

Place of Issue (दिल्याचे ठिकाण):

(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) Address (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 10/561,विक्रमनगर ,इचलकरंजी ,हातकणंगले,शिवाजी नगर,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 10/561,विक्रमनगर ,इचलकरंजी ,हातकणंगले,शिवाजी नगर,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.):

Mobile (मोबाइल नं.): 91-9823458585

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दष्यंत विश्वास कोळी | | | 1. फरच्युन प्लाझा मागे फ्लट नं, फरच्युन अव्हेन्यु,सांगली रोड,, इचलकरंजी,हातकणगले,शिवाजी नगर,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|

10 Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 Inquest Report / U.D. case No., if any
(इनक्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र., जर असल्यास)):

S.No. UIDB Number
(अ.क्र.) (यु.आय.डी.बी.क्र.)

12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 23/12/2024

मी विश्वनाथ कृष्णा घाटगे, वय 45 वर्षे व्यवसाय स्टॅम्प व्हेंडर,रा.10/561 विश्वनाथ, इचलकरंजी ता हातकणंगले जि.कोल्हापूर मो.नं.9823458585 समक्ष पोलीस ठाणेस हजर राहून फिर्याद देतो की,

मी दिनांक 12/09/2024 रोजी अ[illegible]न्टी करप्शन ब्युरो महाराष्ट्र या कार्यालयाचे वेबसाईटवर ऑनलाईन तक्रारी अर्ज केला होता. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक वैष्णवी पाटील यांनी माझे तक्रारीचे अनुषंगाने चौकशी करण्याकरीता मला संपर्क केला होता. त्यानंतर दि.24/09/2024 रोजी मी समक्ष पोलीस उपअधीक्षक वैष्णवी पाटील, अ[illegible]न्टी करप्शन ब्युरो कोल्हापूर यांना भेटून माझेकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत तक्रार दाखल केली. मी वरील पत्त्यावर राहणेस आहे. माझे व स्व. हिस्सेदार यांचे नावे मौजे शहापूर येथील गट नं.454 सिटीस 19021 मधील प्लॉट नं.27,28,29,30, मधील प्लॉट नं.27, 30 व प्लॉट नं.28 व 29 असे प्लॉट सामीलीकरण करण्याकरीता दोन वेगवेगळे अर्ज मी दि.22/07/2024 रोजी नगर भुमापन अधिकारी, इचलकरंजी या कार्यालयामार्फत दिलेले आहेत. सदरचे अर्ज नगर भुमापन कार्यालयातील कर्मचारी लालसिंग यांचेकडे असल्याने त्यांचेकडे मी समक्ष वेळोवेळी चौकशी करीता जात होतो. त्यावेळी लालसिंग यांनी माझे वरील दोन्ही अर्ज व प्रकरणे ही जिल्हाअधीक्षक भुमि अभिलेख कोल्हापूर यांचे कार्यालयाकडे दि.02/09/2024 रोजी पाठवून त्यांनी पत्र मला दिली होती. त्यानंतर मी दि.10/09/2024 रोजी लालसिंग यांना त्यांचे कार्यालयामध्ये भेटलो. त्यावेळी त्यांनी जिल्हा अधीक्षक भुमि अभिलेख कोल्हापूर यांचे कार्यालयातील तुमचे अर्ज ज्या टेबलला आहे त्या टेबलचा चार्जही माझेकडे आहे व आठवड्यातून एक दिवस मी तेथे जावून काम करीत असतो. मी तुमच्या अर्जावर मंजूरी घेवून आणू शकतो त्याकरीता 30,000/- रू. द्यावे लागतील. असे म्हणून त्यांनी वरिष्ठांचेकरीता लाचेची मागणी केली आहे. मी लालसिंग यांना उद्याक दि.25/09/2024 रोजी भेटणेस जाणार आहे तत्पुर्वी आपल्याला फोनद्वारे कळवितो. त्यावेळी आपणाकडून कारवाई व्हावी म्हणुन अर्ज दिला होता.

दिनांक 25/09/2024 रोजी मी पाटील मॅडम यांचे मोबाईलवर दुपारी संपर्क करून लालसिंग यांना भेटण्याकरीता जाणार असल्याचे कळविले. नंतर पाटील मॅडम ह्या त्यांचेकडील स्टाफ व दोन शासकीय पंचासह माझे इचलकरंजी येथील स्टॅम्प व्हेंडर कार्यालयामध्ये 15.35 वा.चे सुमारास आल्या. त्यावेळी पाटील मॅडमनी माझी दोन्ही पंच, व त्यांचेकडील स्टाफ सोबत ओळख करून दिली. त्यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी त्यांना माझी तक्रार सांगितली. मी लालसिंग यांनी मला त्यांचे कोल्हापूर येथील जिल्हा अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालयात बोलविले असल्याचे सांगितले. त्यानंतर पाटील मॅडमनी पुढील कारवाई कोल्हापूर येथून करण्याचे ठरवुन, मला जुना बुधवार पेठ तालीमचे पाठीमागच्या मोकळ्या जागेत येणेबाबत कळवून, त्याप्रमाणे मॅडम, पंच व स्टाफ यां[illegible]चेसह सदर ठिकाणी 17.05 वा.पोहचल्या. त्यावेळी पाटील मॅडम यांनी पंचासमक्ष पुढील कारवाई करण्याचे आहे असे सांगुन, त्यांच्याकडील व्हाईस रेकॉर्डरची संपुर्ण माहिती आम्हाला देवुन नगर भुमापन अधिकारी यांचे कार्यालयातील कर्मचारी एस.एन.लालसिंग यांच्या लाच मागणीचे अनुषंगाने पडताळणी बाबत आवश्यक सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं 1 [illegible] यांना लालसिंग यांना भेटणेकरीता जिल्हा अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालय कोल्हापूर येथे पाठविले. त्यावेळी मी माझी, लालसिंग व तेथील इतर कर्मचारी यांची भेट झाली त्यावेळी आमच्यात माझे प्लॉट सामीलीकरणाचे अनुषंगाने बोलणे झाले. त्यावेळी इचलकरंजी येथील नगर भुमापन अधिकारी कोळी साहेब हे ही सदर ठिकाणी मिटींगकरीता आले असुन त्यांची भेट घेण्याबाबत लालसिंग यांनी मला सांगितले. त्याप्रमाणे मी कोळी साहेबांना भेटलो. त्यावेळी त्यांनी माझे कामासंदर्भाने चर्चा करून माझे कामाकरीता साहेबांना प्रोटोकॉलच बोलायचं आहे काय ४ असे विचारले होते. त्यानंतर मी लालसिंग यांना कोळी साहेबांनी काही सांगितले आहे काय याबाबत विचारणा केली. त्यावेळी त्यांनी कोळी साहेबांनी उद्या ऑफिसला बोलविले असल्याचे सांगितले. त्यानंतर पुढील कारवाई दि.26/09/2024 रोजी

करण्याचे ठरवुन सदर दिवशीची कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली.

मी दि.26/09/2024 रोजी नगर भुमापन अधिकारी कोळी साहेबांना व लालसिंग यांना भेटण्याकरीता जाणार असलेबाबत पाटील मॅडम यांना सांगितलेनंतर पाटील मॅडम, दोन शासकीय पंच व त्यांचा स्टाफ असे माझे इचलकरंजी येथील कार्यालयामध्ये सकाळी 11.30 वा.दाखल झाले. त्यांनी पुढील कारवाई सुरु केली. त्यानंतर आम्हाला योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं.1 यांना कोळी यांना भेटणेकरीता त्याचे कार्यालयात पाठविले. त्यावेळी तेथे माझी व कोळी साहेब व लालसिंग याची भेट झाली. त्यावेळी आमचेत माझे कामासंदर्भात बोलणे झाले. त्यावेळी कोळी साहेबांनी मला हे बघा आपण मोजणी केली तरी विषय नाही. जास्त काय अपेक्षा नाहीत असं वाटतयं मला, जे म्हणजे 50 ते एकच्या मधी अपेक्षा असतील असे म्हणाले त्यावर मी 50 ते एक असे म्हणाले. त्यावेळी कोळी साहेबांनी तुम्ही सांगा मी सांगतो, त्यांना त्यावर मी काय योग्य होईल, दिल तर बर होईल ते सांगा असे म्हणालो त्यावर कोळी साहेबांनी माझे प्लॅाटचे मोजणीचे तारखेबाबत व फी बाबत चर्चा करून त्याकरीता कस ही तीस- पस्तीस जाणारच आहेत जे रेग्युलर मध्ये जाणार आहेत ठीक आहे ते जाणारच होते कशाला वेळ पैसा घालण्यात काय अर्थ आहे असे म्हणाले त्यावर मी त्यांना बरं असे म्हणालो त्यावेळी कोळी साहेबांनी , साहेबाला एक....पंच्याहत्तर पर्यंत देवुन टाकू आपण.... असे म्हणाले. त्यावर मी त्यांना पच्याहत्तर हजार असे म्हणालो. त्यावेळी कोळी साहेबांनी हु... असे म्हणाले. त्यानंतर माझे व कोळी साहेबांचेमध्ये पैसे कधी द्यायचे,कसे द्यायचे याअनुषंगाने चर्चा झाली. त्यावेळी कोळी साहेबांनी कन्फर्म करून मग सांगतो, ते कुठे चाललेत, काय आपण कुठे चाललेत... असे म्हणाले. त्यानंतर मी व पंच नं.01 पाटील मॅडम थांबलेल्या ठिकाणी माझे कार्यालयामध्ये आलो व त्यांना हकीकत सांगितली. नगरभुमापन अधिकारी कोळी साहेबांनी जिल्हा अधीक्षक भुमी अभिलेख कोल्हापूर यंाचे करीता 75,000/- द्यावे लागतील असे म्हणून त्याबाबत दोन दिवसांनी कन्फर्म करून सांगतो म्हणालेने, मला कोळी साहेब ज्यावेळी सांगतील त्यावेळी पुढील कारवाई करण्याचे ठरवुन त्या दिवशीची कारवाई तात्पुरती स्थगित केली.

दि.30/09/2024 रोजी मला नगरभुमापन अधिकारी कोळी साहेबांच्या सहीच्या माझे गट नं.454 सि.स.नं. 19021 मधील प्लॉटचे सामीलीकरण अर्जामध्ये त्रुटीच्या व त्या त्रुटी पुर्णकरून 15 दिवसांत प्रकरण पुन्हा सादर करणेची नोटीस मला पोस्टाने प्राप्त झाली. ती नोटीस घेवून मी दि.01/10/2024 रोजी कोळी साहेबांना भेटण्याकरीता जाणार असून, पुढील कारवाई करणेबाबत मी पाटील मॅडम यांना कळविले होते. त्याप्रमाणे पाटील मॅडम,पंच व स्टाफ असे माझे इचलकरंजी येथील स्टॅम्प व्हेंडर कार्यालयामध्ये आले व त्यांनी पुढील कारवाई सुरु केली.त्यानंतर मला व पंच नं.01 यांना योग्य त्या सुचना दिल्या व व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं.1 यांना कोळी यांना भेटणेकरीता त्यांचे कार्यालयात पाठविले. परंतु त्यावेळी नगरभुमापन अधिकारी यांचे कार्यालय बंद असल्याने कोळी साहेबांची भेट झाली नाही. त्यामुळे आम्ही परत येवुन मॅडमनां सर्व हकीकत सांगितली. त्यावेळी नमुद दिवशीची कारवाई तात्पुरती स्थगित केली. त्यानंतर मी कोळी साहेब त्यांचे कार्यालयामध्ये हजर असतील त्यावेळी कळवितो. व पुढील कारवाई करण्याचे ठरविले.

दिनांक 03/10/2024 रोजी मी पाटील मॅडम यांना फोनवर संपर्क करून कोळी साहेब दि.04/10/2024 रोजी त्यांचे कार्यालयामध्ये हजर असणार आहेत त्यावेळी पुढील कारवाई करण्याबाबत कळविले. त्याप्रमाणे दि. 04/10/2024 रोजी पाटील मॅडम,पंच,स्टाफ असे 11.35 वा.माझे स्टॅम्प व्हेंडर कार्यालय,इचलकरंजी येथे आले. व पुढील कारवाई सुरू केली. त्यानंतर मला व पंच नं.01 यांना योग्य त्या सुचना दिल्या व व्हाईस रेकॉर्डर चालु करून तो माझ्याकडे देवुन मला व पंच नं.1 यांना कोळी यांना भेटणेकरीता त्यांचे कार्यालयात पाठविले. त्यावेळी तेथे माझी व कोळी साहेब यांची भेट झाली. त्यावेळी कोळी साहेबांनी आयला धोका झालाय, तुम्हाला काय मला बी झालाय, काहीतरी लडतर झालीया, तुम्हाला त्या प्रश्नाचे उत्तर दयायच हाय. पण थांबा मला थोडीशी कन्फर्मेशन घेवू दया... असे म्हणून मला वैयक्तीक भेटायचे आहे असे सांगुन मला भुखंड मोजणीबाबत अर्ज करायला सांगितला. त्यानंतर आम्ही परत येवुन मॅडमनं सर्व हकीकत सांगितली. नगर भुमापन अधिकारी कोळी साहेबांना माझा संशय आला असल्याने, मी त्यांनी सांगितलेप्रमाणे माझे भुखंड मोजणीचे अर्ज देणार आहे. त्यावेळी कोळी साहेब यांचे काय म्हणणे आहे याबाबत ऐकूण पुढील कारवाई करणेबाबत ठरविले व चालु कारवाई तात्पुरती स्थगित केली.

दिनांक 28/11/2024 रोजी मी पाटील मॅडम यंाना फोन करून माझे प्लॉट सामीलीकरणाचे भुखंडाची मोजणी झालेली आहे, त्याचा नकाशा व नोटीसमधील त्रुटींची पुर्तता करून मुळ अर्जाप्रमाणे भुखंड सामीलीकरण होण्यारकरीता अर्ज दिला आहे. तो कोल्हापूर येथील जिल्हा अधीक्षक भुमी अभिलेख कार्यालयामध्ये पाठविण्यात आला आहे.व उदया मी कोळी साहेबांना भेटण्यास जाणार आहे त्यावेळी पुढील कारवाई करणेबाबत कळविले. त्याप्रमाणे दि.29/11/2024 रोजी पाटील मॅडम,पंच,स्टाफ असे 12.52 वा.माझे स्टॅम्प व्हेंडर कार्यालय, इचलकरंजी येथे आले व त्यांनी पुढील कारवाई सुरू केली. त्यानंतर मला व पंच नं.01 यांना योग्य त्या सुचना

दिल्या. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर चालू करुन तो माझ्याकडे देवून मला व पंच नं.1 यांना कोळी यांना भेटणेकरीता त्यांचे कार्यालयात पाठविले. त्यावेळी तेथे माझी व कोळी साहेब यांची भेट झाली. व माझे प्लॉट सामीलीकरणाचे कामाबाबत चर्चा झाली व कोळी साहेबांनी त्यांना नकाशाच पाहीजे होता, तो मिळाला नकाशा, त्यांना काय अडचण नाही. आता त्यावेळी त्यांनी हेल्प केली असती तर, हे केले असते असे म्हणुन आता त्यांना एंटरटेनमेंट करण्याची गरज नाही असे म्हणाले. त्यानंतर आम्ही परत येवुन पंचांना सर्व हकीकत सांगितली.कोळी साहेबांनी त्यांचे वरिष्ठांकरीता यापुर्वी माझेकडे केलेल्या लाच मागणीचे पैसे देण्याची गरज नाही असे म्हणालेने, ते त्यांचे वरिष्ठांकरीता पैशांची मागणी करणार नाहीत व वरिष्ठांकरीता माझेकडुन पैसे स्विकारणार नसल्याची माझी खात्री झालेने, मी सदरची कारवाई थांबविण्याबाबत पाटील मॅडम यांना सांगितलेनंतर त्यांनी पुढील कारवाई बंद केली.

तरी दुष्यंत कोळी, नगर भुमापन अधिकारी, इचलकरंजी यांनी माझे व सहहिस्सेदार यांचे शहापूर गट नं.454, सिसंन.19021 मधील प्लॉट नं.27,28,29,30 पैकी प्लॉट नं.27,30 व प्लॉट नं.28,29 या प्लॉटचे सामीलीकरण करण्याकरीता जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख, कोल्हापूर यांचेकरीता कोळी साहेबांनी साहेबाला पंच्याहत्तर पर्यंत देवुन टाकू असे म्हणुन माझेकडे पंच्याहत्तर हजार रुपये लाचेची बेकायदेशीररित्या व अप्रामाणिकपणे मागणी केली आहे. म्हणुन दुष्यंत विश्वास कोळी, वय.37 वर्षे,नगर भुमापन अधिकारी, इचलकरंजी वर्ग-2 (महसुल व वन विभाग )रा.सध्या फॉरच्युन प्लाझा मागे फ्लॅट नं.207,फॉरच्युन अव्हेन्यु,सांगली रोड,इचलकरंजी मुळ रा. शिरोळ वाडी रोड,प्रभात हॉस्पीटल,जयसिंगपुर,ता.शिरोळ,जि.कोल्हापुर यांचेविरुध्द माझी फिर्याद आहे.

माझा वरील वर्दीजबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखित केलेला असून तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

समक्ष                                        हा दिला जबाब स. ता. म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरुन अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

SACHIN DINKAR PATIL(I (Inspector)) / 1510100004025DPM8401Y

or (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):                    **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

विश्वनाथ कृष्णा घाटगे

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार, पोलीस ठाणे इचलकरंजी.

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** SACHIN DINKAR PA

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** 15101000402SDPM840